नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - ३४८ Issue - 348 | वार बुधवार दि. ७ मे २०२५ Blow- Wednesday Date 7 May 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# पुढील चार महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घ्या

## राज्य निवडणूक आयोगाला सुप्रिम कोर्टाचे आदेश; ओबीसींच्या जागा कमी न करता निवडणुका घ्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत सर्वोच्च न्यायालयाने महत्वाचा निर्णय दिला आहे. पुढील चार महिन्यांत निवडणुका घेण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे निवडणुकीचा मार्ग मोकळा होणार आहे. ठरावीक वेळेतच या निवडणुका घेण्याचे निर्देश राज्य निवडणूक आयोगाला देण्यात आले आहेत. यामध्ये एक मुद्दा प्रकर्षाने समोर येतो तो ओबीसींच्या राजकीय आरक्षणाचा, याची दखलही न्यायालयाने घेतली आहे. ओबीसींच्या जागा कमी न करता या निवडणुका घेण्याचे आदेश देण्यात आले. राजकीय आरक्षणाला धक्का न लागता या निवडणुका आता होणार आहेत. त्यामुळे ओबीसींसाठी हा मोठा दिलासा आहे.

मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत महत्वाची सुनावणी पार पडली. राज्यात अनेक महापालिकांच्या निवडणुका रखडल्या आहेत. राज्यातील अनेक महापालिकेत पाच वर्षांपासून निवडणुका झाल्याच नाहीत. प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने निवडणुका लांबणीवर पडत होत्या. महापालिकेचा कारभार प्रशासकांच्या हाती आहे. हे लक्षात घेऊन सर्वोच्च न्यायालयाने 'हे लोकशाहीसाठी योग्य नसल्याचे' नमूद केले आहे. न्यायालयाने आता येत्या चार आठवड्यात निवडणुकीच्या नोटिफिकेशन्स काढण्याच्या सूचना दिल्या. तसेच चार महिन्यात निवडणुका घेण्याचे आदेशही दिले आहेत.

सुनावणीदरम्यान, ओबीसींच्या आरक्षणाचा मुद्दाही समोर आला. बांठिया आयोगाने २०२२ मध्ये कोर्टात अहवाल सादर केला होता. यानुसार निवडणुका घेण्याच्या मुद्याकडे आयोगाने न्यायालयाचे लक्ष वेधले होते. आयोगाचे अध्यक्ष जयंतकुमार बांठिया यांनी मागासवर्गीय आयोगाच्या पूर्वीच्या अहवालातील त्रुटी पूर्ण करुन हा अहवाल तयार केला होता. ज्यामध्ये २७ टक्के आरक्षणाची शिफारस न करता प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थांत लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षणाची शिफारस केली. आणि ३४



हजार जागा कमी करण्यात आल्या. याविरोधात याचिकाही करण्यात आल्या. त्यावर कोर्टाने ओबीसींच्या जागा कमी न करता निवडणुका घेण्याचे आदेश दिले.

### देशवासियांना दिलं मोठं आश्वासन
## भारत–पाकिस्तान जल करारावरुन पंतप्रधान मोदींचा दृढ निश्चय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी (झच् चेवळ) यांनी मंगळवारी एका कार्यक्रमात भारतासाठी मोठी घोषणा केली आहे. 'या सरकारसाठी राष्ट्रीय हित हे नेहमीच सर्वोतोपरी राहणार आहे. पूर्वीच्या सरकारांमध्ये स्वार्थामुळे निर्णय पुढे ढकलले जात होते, पण आता तसे नाही. आता निर्णय लगेच घेतले जातात. आता परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे.' असे उद्गार त्यांनी काढले.

खाजगी वृत्तवाहिनीच्या एका कार्यक्रमात बोलताना पंतप्रधान म्हणाले की, आजकाल



माध्यमांमध्ये पाण्याबद्दल (खपर्वीी ढीशर–ीं) खूप चर्चा सुरू आहे. पंतप्रधानांनी हे सांगताच कार्यक्रमात जोरदार घोषणाबाजी सुरू झाली. काही सेकंद थांबल्यानंतर, पंतप्रधान मोदी पुन्हा बोलू लागले. ते म्हणाले की, पूर्वी भारताचे पाणीही बाहेर जात होते. पण आता भारताचे पाणी भारतातच वाहणार आहे. ते भारताच्या बाजूने राहील आणि फक्त भारतासाठी उपयुक्त ठरेल. पंतप्रधानांनी आपल्या भाषणात पाकिस्तानचे नाव घेतले नसले तरी तिथे उपस्थित असलेल्या लोकांनी घोषणाबाजी सुरू केली. यावर पंतप्रधान मोदी तात्काळ प्रतिक्रिया दिली की, तुम्हाला खूप लवकर समजले.

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले की, 'तुम्हाला आठवते का १० वर्षांपूर्वी जेव्हा मी डिजिटल इंडियाबद्दल बोलत असे, तेव्हा बरेच लोक खूप शंका व्यक्त करायचे, पण आज डिजिटल इंडिया आपल्या जीवनाचा एक नैसर्गिक भाग बनला आहे. स्वस्त डेटा आणि स्वस्त मेड इन इंडिया स्मार्टफोन्सने एका नवीन क्रांतीला जन्म दिला आहे. यामुळे राहणीमानात सुधारणा झाली आहे. त्याने कंटेटचे एक नवीन जग निर्माण केले आहे. आज गावात चांगले जेवण बनवणारी एक महिला दशलक्ष ग्राहकांच्या क्लबमध्ये समाविष्ट आहे.

मोदींनी पुढे असेही नमूद केले की, आपले बँकिंग क्षेत्र अर्थव्यवस्थेचा कणा आहे. यापूर्वी, बँकांच्या तोट्यावर चर्चा केल्याशिवाय पूर्ण होणारी अशी कोणतीही शिखर परिषद नव्हती. बँका आधीच पूर्णपणे उद्ध्वस्त होण्याच्या उंबरठ्यावर पोहोचल्या होत्या. आज भारताचे बँकिंग क्षेत्र जगातील सर्वात मजबूत प्रणालींपैकी एक आहे. आपल्या बँका आता नफ्यात आहेत.

तर, 'आपल्या देशाच्या माजी पंतप्रधानांनी कबूल केले होते की, जर सरकारने एका गरीबाला १ रुपया पाठवला तर ८५ रुपये लुटले जातात. सरकारे बदलत राहिली पण गरिबांना पूर्ण पैसे मिळावेत यासाठी कोणतेही काम झाले नाही. जर दिल्लीतून १ रुपया आला तर संपूर्ण रक्कम गरिबांच्या खात्यात पोहोचली पाहिजे. यासाठी आम्ही बँकिंग व्यवस्था मजबूत केली,' असे म्हणत मोदींनी विरोधकांवर वार केला.

# तणाव वाढलेला असताना मोठा निर्णय; केंद्राकडून नोटिस टू एअरमन जारी; उद्या भारत ताकद दाखवणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दिल्ली : पहलमागमधील दहशतवादी हल्ल्याला दोन आठवडे झालेले आहेत. या हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला. या हल्ल्याचे धागेदोरे पाकिस्तानपर्यंत पोहोचल्यानं भारतानं शेजारी देशाविरोधात आक्रमक निर्णय घेतले आहेत. पाकिस्तानची सगळ्या आघाड्यांवर कोंडी करण्याचा प्रयत्न भारताकडून सुरु आहे. दहशतवाद पोसणाऱ्या शेजारी देशाचं कंबरडं मोडण्यासाठी भारत सरकारनं निर्णयांचा धडाका लावला आहे. भारत केव्हाही सैनिकी कारवाई करु शकतो, अशी भीती पाकिस्तानला वाटू लागली आहे. त्यातच उद्या भारताकडून पाकिस्तानी सीमेजवळ हवाई



अभ्यास केला जाणार आहे. यासंदर्भातील नोटिस टू एअरमन जारी करण्यात आलं आहे.

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध ताणलेले असताना केंद्र सरकारनं महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. भारत ७ आणि ८ मे रोजी पाकिस्तानी सीमेलगत हवाई अभ्यास करेल. याबद्दलचं नोटिस टू एअरमन केंद्राकडून जारी करण्यात आलेलं आहे. हवाई अभ्यासात भारताचं हवाई दल राजस्थानजवळ शक्तीप्रदर्शन करणार आहे. युद्ध सज्जता तपासून पाहण्यासाठी हवाई दल उद्या सीमावर्ती भागात हवाई अभ्यास करेल. सीमेवरील वाढता तणाव पाहता हा अभ्यास भारताच्या सतर्कतेचा संकेत आहे.

७ आणि ८ मे रोजी राजस्थानात भारत–पाकिस्तान सीमेवर भारतीय हवाई दल हवाई अभ्यास करेल.

यासाठी छजढच् (नोटिस टू एअरमन) जारी करण्यात आलेलं आहे. छजढचचा अर्थ वैमानिकांना दिली जाणारी सूचना असा होतो. हा अभ्यास हवाई दलाच्या नियमित तयारीचा भाग आहे. छजढचनुसार, हवाई अभ्यासाला ७ मेच्या दुपारी ३.३० वाजता सुरुवात होईल. ८ मेच्या रात्री ९.३० वाजता अभ्यासाची सांगता होणार आहे.

राजस्थानची सीमा पाकिस्तानला लागून आहे. त्या भागात हवाई दलाचा अभ्यास चालेल. या कालावधीत प्रवासी विमानांवर काही निर्बंध असतील. या हवाई अभ्यासात लढाऊ विमानांसह टेहळणी विमानांचादेखील सहभाग असेल. युद्धाच्या परिस्थितीत कारवायांचा सराव हवाई दलाकडून केला जाईल. सध्या सीमावर्ती भागात असलेला तणाव पाहता हवाई दलाच्या अभ्यासाची वेळ आणि ठिकाण अतिशय महत्त्वाचं आहे.

# पहलगाममध्ये जेथे रक्तपात झाला, तेथेच एक संशयित...; सुरक्षा दलांकडून अटक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्रीनगर : पहलगाम हल्ल्यानंतर पडसाद देशभर उमटत आहेत. अशातच मोठी बातमी समोर येत आहे. भारतीय सुरक्षा दलांनी सोमवारी बैसरन खोऱ्यात वावरणाऱ्या एका संशयास्पद व्यक्तीला बुलेटप्रूफ जॅकेट कव्हरसह अटक केली आहे. बैसरन खोऱ्यात सुरु असलेल्या शोध मोहिमेदरम्यान त्याला अटक करण्यात आली.

या संशयिताची अहमद बिलाल म्हणून ओळख पटवण्यात आली आहे. जेव्हा त्याला ताब्यात घेतले तेव्हा त्याने बुलेटप्रूफ जॅकेट घातले होते. सुरक्षा दलांनी त्याला चौकशीचा भाग म्हणून प्रश्न विचारले असता, बिलालने उडवाउडवीची उत्तर दिली आहेत. पहलगाम हल्ल्यानंतर साऱ्या देशवासीयांमध्ये संतापाचे वातावरण असताना त्याला ताब्यात घेण्यात आले आहे. सुरक्षा यंत्रणा आणि पोलीस पुढील तपास करत आहेत.

या संशयिताने मात्र बुलेटप्रूफ जॅकेट कुठून मिळवले हे स्पष्ट केलेले नाही. सुरक्षा कर्मचाऱ्यांनी त्याला ताब्यात घेत पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. याचप्रमाणे आज सकाळी जम्मू आणि काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यातील नियंत्रण रेषेवर देखील एका २६ वर्षीय पाकिस्तानी घुसखोराला अटक करण्यात आली आहे. या कारवाईंमुळे दहशतवाद्यांचे धाबे दणाणणार हे मात्र स्पष्ट आहे. वृत्तानुसार, अटकेच्या वेळी घुसखोराकडे कोणतेही गुन्हेगारी साहित्य मिळालेले नाही.



एशिया न्यूज ऑब्झर्व्हरच्या वृत्तानुसार, सुरक्षा दलांकडून संशयिताला ताब्यात घेऊन पोलीसांच्या स्वाधीन केले आहे. सध्या त्याच्या मानसिक स्थितीचे मूल्यांकन करत आहेत.

हेही लक्षात घेण्यासारखे आहे की, दहशतवाद्यांना रसद पुरवल्याच्या संशयावरून एका २३ वर्षीय तरुणाला अटक करण्यात आली होती. तो कुलमनमधील तंगमार्ग येथील रहिवासी असल्याचे समजते.

### चोंडीतील ऐतिहासिक मंत्रिमंडळ बैठकीत सरकारकडून ११ महत्त्वाचे निर्णय

### राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त

# अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मृतिस्थळाचे जतन आणि संवर्धनासाठी ६८१ कोटी रुपयांचा निधी मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अहिल्यानगर: राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर आज अहिल्यानगर जिल्ह्यातील चोंडी इथं राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत सरकारकडून अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मृतिस्थळाचे जतन आणि संवर्धनासाठी ६८१ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून अनेक महत्त्वपूर्ण निर्णयांची घोषणा केली आहे.

चोंडीतील मंत्रिमंडळ बैठकीत कोणकोणते निर्णय घेतले?

१. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनचरित्रावर आधारित व्यावसायिक मराठीसह बहुभाषिक चित्रपटाची शासनामार्फत निर्मिती करणार

– महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी, सांस्कृतिक विकास महामंडळ कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून काम करणार

– व्यावसायिक चित्रपट असल्याने लागणारा खर्च हा अर्थसंकल्पीय मागण्यांतून उपलब्ध करुन देणार


२. राज्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी आदिशक्ती अभियान राबवणार/आदिशक्ती पुरस्कार प्रदान करणार

– राज्यातील महिलांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य विषयक समस्यांबाबत समाजात संवेदनशीलता निर्माण करणार. अभियानाच्या माध्यमातून जनजागृती आणि चळवळ निर्माण करणार

– कुपोषण, बालमृत्यू, मातामृत्यूचे प्रमाण कमी करणे, लिंगभेदात्मक बाबी दूर सारत मुलींमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढवणे, बालविवाहमुक्त समाजनिर्मिती, लैंगिक–शारीरिक अत्याचाराला प्रतिबंध करुन हिंसाचारमुक्त कुटुंब आणि समाजनिर्मिती, अनिष्ठ रुढींचे निर्मूलन, महिलांना शासकीय योजनांचा लाभ आणि स्वयंरोजगाराच्या संधी यातून आर्थिक विकास

– हे आदिशक्ती अभियान उत्कृष्टपणे राबविणार्या ग्रामपंचायतींना आदिशक्ती पुरस्कार देणार

– हे अभियान राबवण्यासाठी १०.५० कोटी रुपये खर्च करणार



३. धनगर समाजातील विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळेत शिक्षण देण्याच्या योजनेला राजे यशवंतराव होळकर यांचे नाव.

'यशवंत विद्यार्थी योजना' म्हणून ही योजना आता राबवणार

– दरवर्षी १०,००० विद्यार्थ्यांना नामांकित शाळेत शिक्षण

– आतापर्यंत यासाठी २८८.९२ कोटी रुपये वितरित

– राजे यशवंतराव होळकर यांनी १७९७ ते १८११ या काळात शैक्षणिक प्रगतीसाठी अनेक कामे केली. गुरुकुलसारख्या पारंपारिक शिक्षणाला चालना दिली. लष्करी शिक्षणात शिस्त, नीती आणि नेतृत्त्वगुणांचा समावेश केला. शिक्षण सर्वांसाठी खुले केले. राजवाड्यात मुलींसाठी शिक्षणाच्या सुविधा उभारल्या. आता त्यांच्या नावे ही योजना

४. धनगर समाजातील मॅट्रीकोत्तर शिक्षण घेणार्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी महसूल विभागाच्या मुख्यालयांच्या ठिकाणी वसतीगृह बांधण्याच्या योजनेला 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वसतिगृह योजना' असे नाव

– राज्यातील महसूल विभागाच्या मुख्यालयी धनगर समाजातील मॅट्रिकोत्तर शिक्षण घेणार्या विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह

– प्रत्येकी २०० क्षमतेची ही वसतीगृह असणार. यात मुलांसाठी १०० क्षमतेचे तर, मुलींसाठी १०० क्षमतेचे.

– नवी मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नागपूर, अमरावती येथे वसतीगृह

– नाशिक येथे काम सुरु, पुणे, नागपूर येथे लवकरच सुरु होणार

– या वसतीगृहांना आता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वसतिगृह योजना असे नाव

५. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी उभारलेल्या घाट, विहिरी, पाणीवाटप प्रणालीचे सर्वेक्षण करुन त्यांच्या जतनासाठी विशेष योजना राबवणार

– राज्यात असे ३ ऐतिहासिक तलाव (चांदवड, त्र्यंबकेश्वर, मल्हार गौतमेश्वर, जेजुरी)

– राज्यात अशा १९ विहिरी

– राज्यात असे एकूण ६ घाट

– राज्यात असे एकूण ६ कुंड

– अशा एकूण ३४ जलाशयांची दुरुस्ती, गाळ काढणे, पुनरुज्जीवन, सुशोभिकरण इत्यादी कामे करणार

– यासाठी ७५ कोटी रुपये खर्च करणार

६. अहिल्यानगर जिल्ह्यात १०० विद्यार्थी क्षमतेचे (पान २ वर...)

## संपादकीय....

### दृढनिश्चय

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी एका कार्यक्रमात भारतासाठी मोठी घोषणा केली आहे. 'या सरकारसाठी राष्ट्रीय हित हे नेहमीच सर्वोतोपरी राहणार आहे. पूर्वीच्या सरकारांमध्ये स्वार्थामुळे निर्णय पुढे ढकलले जात होते, पण आता तसे नाही. आता निर्णय लगेच घेतले जातात. आता परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. खाजगी वृत्तवाहिनीच्या एका कार्यक्रमात बोलताना पंतप्रधान म्हणाले की, आजकाल माध्यमांमध्ये पाण्याबद्दल खूप चर्चा सुरू आहे. पंतप्रधानांनी हे सांगताच कार्यक्रमात जोरदार घोषणाबाजी सुरू झाली. काही सेकंद थांबल्यानंतर, पंतप्रधान मोदी पुन्हा बोलू लागले. ते म्हणाले की, पूर्वी भारताचे पाणीही बाहेर जात होते. पण आता भारताचे पाणी भारतातच वाहणार आहे. ते भारताच्या बाजूने राहील आणि फक्त भारतासाठी उपयुक्त ठरेल. पंतप्रधानांनी आपल्या भाषणात पाकिस्तानचे नाव घेतले नसले तरी तिथे उपस्थित असलेल्या लोकांनी घोषणाबाजी सुरू केली. यावर पंतप्रधान मोदी तात्काळ प्रतिक्रिया दिली की, तुम्हाला खूप लवकर समजले 'तुम्हाला आठवते का १० वर्षांपूर्वी जेव्हा मी डिजिटल इंडियाबद्दल बोलत असे, तेव्हा बरेच लोक खूप शंका व्यक्त करायचे, पण आज डिजिटल इंडिया आपल्या जीवनाचा एक नैसर्गिक भाग बनला आहे. स्वस्त डेटा आणि स्वस्त मेड इन इंडिया स्मार्टफोन्सने एका नवीन क्रांतीला जन्म दिला आहे. यामुळे राहणीमानात सुधारणा झाली आहे. त्याने कंटेटचे एक नवीन जग निर्माण केले आहे. आज गावात चांगले जेवण बनवणारी एक महिला दशलक्ष ग्राहकांच्या क्लबमध्ये समाविष्ट आहे.

# मेघगर्जनेसह पावसाची शक्यता; हवामान खात्याचा अंदाज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : राज्यात विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रासह विविध ठिकाणी सोमवारी अवकाळी पाऊस आणि गारपिटीचा तडाखा बसला. त्यामुळे उन्हाळी पिकांचे नुकसान झाले. मराठवाड्यात वेगवेगळ्या ठिकाणी पावसादरम्यान वीज कोसळून तिघांचा मृत्यू झाला. दरम्यान, पुणे, सातारा, सांगली या जिल्ह्यांत बुधवारपर्यंत 'यलो लर्ट' देण्यात आला आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील लोणार व सिंदखेड राजा तालुक्यांच्या काही भागाला अवकाळी पावसाचा तडाखा बसला. वादळी पाऊस, गारपिटीने नागरिकांची दैना उडाली. वीज कोसळून तीन गुरे ठार झाली. काही ठिकाणी लग्नसोहळ्यांनाही वादळाचा फटका बसला.

वाशीम शहरासह रिसोडमध्ये सोमवारी दुपारी अवकाळी पावसासोबत गारपीट झाली. यात उन्हाळी मूग आणि भुईमुगाचे नुकसान झाले. वर्धा जिल्ह्यात सेलू तालुक्यातील मोर्चापूर, गोंदापूर, सूरगाव, कान्हापूर, पवनारला गारपिटीचा फटका बसला.

नाशिक जिल्ह्यात मनमाड, तर जळगाव जिल्ह्यात अमळनेर, धरणगाव, चोपडा तालुक्यांत सोमवारी गारपिटीसह पावसाचा तडाखा बसला. काही भागांत कांद्याचे नुकसान झाले. मनमाड शहर व परिसरात सोमवारी दुपारी गारपीट झाली. वीस ते पंचवीस मिनिटे गारांचा पाऊस झाला. गारपिटीमुळे कांदा पिकाला फटका बसला आहे.

मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर आणि परभणी जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह गारपीट आणि पाऊस झाल्यामुळे फळबागा आणि शेतीचे मोठे नुकसान झाले. अंगावर वीज कोसळल्यामुळे तिघांचा मृत्यू झाला. पुढील दोन दिवस हलक्या ते मध्यम स्वरूपात पाऊस होईल, असा अंदाज आहे.



मराठवाड्याच्या काही भागाला सोमवारी अवकाळी पावसाने झोडपले. दुपारी वादळासह गारपीट आणि पाऊस झाला. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड, खुलताबाद, फुलंब्री, पैठण तालुक्यातील अनेक गावांत जोरदार पाऊस झाला. खुलताबाद तालुक्यात वादळामुळे लग्न सोहळ्यात धांदल उडाली. काही ठिकाणी वाऱ्यामुळे मांडव पडल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

गंगापूर तालुक्यातील लासूर बाजार समितीत अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. तिथे पावसामुळे धान्याची पोती भिजली. वाळूज-पंढरपूर भागात गारपीट झाली. या भागात मोठ्या आकाराच्या गारा पडल्या.

या आठवड्याअखेरपर्यंत राज्यात पावसाची शक्यता असून, या काळात कोकण विभागात तापमानात किंचित घट झाली आहे. मुंबईत आर्द्रतेचे प्रमाण वाढले असून, सोमवारी आभाळ ढगाळ होते. मंगळवारी आणि बुधवारी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता वर्तवली आहे. मुंबईत या दोन्ही दिवशी 'यलो लर्ट' असून, राज्यात पुढील दोन दिवसांत मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे.

सांताक्रूझ येथे सोमवारी ३३.७, तर कुलाबा येथे ३४.२ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. वातावरणात येत्या दोन दिवसांमध्ये आर्द्रता आणखी वाढून तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस पडू शकतो, असा अंदाज प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवला आहे. मुंबईसह पालघर, ठाणे या जिल्ह्यांना; तसेच रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, पुणे, सातारा, सांगली या जिल्ह्यांत बुधवारपर्यंत 'यलो लर्ट' आहे.

मध्य महाराष्ट्रात अनेक ठिकाणी ३८ अंशांच्या पुढे कमाल तापमानाची नोंद झाली. मराठवाडा, विदर्भात ४० अंश किंवा अधिक तापमान नोंदले गेले.

छत्तीसगडवर घड्याळाच्या काट्याच्या विरुद्ध दिशेने फिरणारे आवर्ती चक्रीय वारे व अरबी समुद्रात दीड किलोमीटर उंचीपर्यंत घड्याळाच्या काट्याच्या दिशेने फिरणारे प्रत्यावर्ती चक्रीय वारे अशा दोन्हींच्या संगमातून राज्यभरात गारपिटीची शक्यता निर्माण झाल्याची माहिती निवृत्त हवामान अधिकारी माणिकराव खुळे यांनी दिली. या प्रणालीमुळे अवकाळी पावसाचीही तीव्रता वाढली आहे. आर्द्रतेमुळे उकाड्याचे प्रमाण अधिक आहे. सध्याच्या वातावरणात उष्णतेच्या लाटेपासून केवळ महाराष्ट्रात दिलासा मिळाल्याचे दिसत आहे.

## अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मृतिस्थळाचे जतन आणि संवर्धनासाठी ६८१ कोटी रुपयांचा निधी मंजूर

(पान १ वरून....)

नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित ४३० रुग्णखाटांचे रुग्णालय स्थापन करणार

– या महाविद्यालयाचे नाव पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय असे नाव असेल.

– यासाठी ४८५.०८ कोटी खर्च करणार

– जिल्हा सामान्य रुग्णालयाची जागा, मनुष्यबळासह यासाठी देणार

७. राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून त्यांच्या मंदिर पुनर्निमाणाच्या कामाला अभिवादन म्हणून ५५०३.६९ कोटी रुपयांचे मंदिर विकास आराखडे

– चौंडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतिस्थळाचे जतन आणि संवर्धन : ६८१.३२ कोटी

– अष्टविनायक गणपती मंदिरांचा जिर्णोद्धार: १४७.८१ कोटी

– श्री क्षेत्र तुळजाभवानी देवी मंदिर विकास आराखडा : १८६५ कोटी

– श्री क्षेत्र ज्योतीबा मंदिर विकास आराखडा : २५९.५९ कोटी

– श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर विकास आराखडा: २७५ कोटी

– श्री क्षेत्र महालक्ष्मी मंदिर विकास आराखडा : १४४५.९७ कोटी

– श्री क्षेत्र माहुरगड विकास आराखडा : ८२९ कोटी

८. अहिल्यानगर येथे मुली आणि महिलांसाठी नवीन आयटीआय सुरु करणार

९. राहुरी, जिल्हा अहिल्यानगर येथे दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर स्थापन करण्याचा निर्णय

१०. ग्राम सामाजिक परिवर्तन फाऊंडेशन (व्हीएसटीएफ) अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या मिशन महाग्राम कार्यक्रमाचा कालावधी २०२२-२५ ऐवजी २०२८ पर्यंत वाढविण्याचा निर्णय

११. नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधीकरण अध्यादेश-२०२५ जारी करण्याचा निर्णय

## जिल्ह्यात पाच कृषी पर्यटन केंद्रासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) सोलापूर जिल्हा प्रशासन व प्रकल्प संचालक (आत्मा), सोलापूर कार्यालयाच्या एकात्मिक पर्यटन विकास आराखड्याअंतर्गत, जिल्ह्यातील स्थानिक संस्थांच्या (विशेषत: शेतकरी उत्पादक कंपन्या, बचत गट, उत्पादक गट इत्यादी) माध्यमातून एकूण ५ पथदर्शी कृषी पर्यटन केंद्रे उभारण्याचे प्रस्तावित आहे. हे प्रस्तावित कृषी पर्यटन केंद्रे पंढरपूर, अक्कलकोट, बार्शी आणि करमाळा या ४ प्रमुख मंदिरांच्या परिसरात प्रत्येकी एक केंद्र, तसेच उजनी धरणाच्या जलाशयालगत च्या गावात एक केंद्र उभारणे अभिप्रेत आहे. ही केंद्रे संबंधित मंदिराच्या सुमारे १० कि.मी. त्रिज्येतील मुख्य रस्त्यालगत किंवा जवळच्या ठिकाणी असावीत. उजनीच्या बाबतीत जलाशयालगतच्या गावांमध्ये स्थळ असावे. सी.एल.एफ., सी.एम.आर.सी. यांचा समावेश आहे. प्राप्त अर्जांवर जिल्हास्तरीय तांत्रिक समितीमार्फत ठरवलेल्या निकषानुसार निवड केली जाईल. अर्ज प्रक्रिया व सविस्तर माहिती :- अर्ज व इतर अनुषांगिक माहिती प्रकल्प संचालक (आत्मा), कार्यालय नवीन आरटीओ ऑफिसच्या मागे, विजापूर रोड, सोलापूर येथे उपलब्ध असणार आहे. अर्जाचे शुल्क १०० रूपये असून श्री. फुटाणे विक्रम (एटिएम) मो. ९४२३२३२५६९ यांच्या कडून प्राप्त करून घ्यावा. अर्ज वाटपाचा कालावधी दिनांक ५ मे २०२५ ते १५ मे २०२५ असेल. विहित नमुन्यास परिपूर्ण अर्ज प्रकल्प संचालक (आत्मा), कार्यालयात सादर करण्याची अंतिम तारीख २० मे २०२५ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत असेल, विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत, अशी माहिती प्रकल्प संचालक, आत्मा, सोलापूर यांनी दिली आहे.

## प्रा.कविता राहुल रुही यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पी. एचडी पदवी प्राप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुणे/प्रतिनिधी - अक्कलकोट तालुक्याच्या प्रा.कविता राहुल रुही यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची हिंदी विषयातील पी. एचडी पदवी प्राप्त झाली असून त्यांनी हिंदी विषयात एकविसाव्या शतकातील प्रथम दशकातील प्रदर्शित नाटकांवर प्रबंध सादर केला होता त्याला विद्यापीठाने विद्यावाचस्पती पदवी बहाल करण्यात आली या यशाबद्दल त्यांचे केंद्रीय सामाजिक न्यायराज्य मंत्री रामदासजी आठवले,सीमाताई आठवले , सोलापूर विद्यापीठ सिनेट सदस्य राजाभाऊ सरवदे,राज्यसभा खासदार चंद्रकांत हांडोरे, अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, (राज्यमंत्री दर्जा) मा.आमदार जयदेव गायकवाड, पुण्याच्या उपमहापौर सुनीता वाडेकर,परशुराम वाडेकर, अधिष्ठाता डॉ.विजय खरे , खडकी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल , टी.जे.कॉलेजचे प्राचार्य डॉ. संजय चाकणे, मीना मनचंदा, अविनाश कोल्हे,अविनाश मडीखांबे, चंद्रशेखर मडीखांबे ,उत्तम गायकवाड अमोलराजे भोसले,महेश इंगळे यांनी अभिनंदन केले तर या प्रबंधात मार्गदर्शक डॉ.विजयकुमार रोडे हिंदी विभागाध्यक्ष डॉ.सदानंद भोसले , डॉ.शशिकला राय यांनी मार्गदर्शन केले. डॉ.कविता राहुल रूही यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## 'एआय'च्या सहाय्याने महाराष्ट्र अन्नधान्य निर्यातीत सर्वोत्तम ठरू शकतो : घोष



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : 'एआय'चा वापर करून महाराष्ट्र अन्नधान्य उत्पादनात आणि निर्यातीत जगातील सर्वोत्तम राज्य बनू शकतो, असा विश्वास निती आयोगाच्या फेलो आणि नॅसकॉमच्या माजी अध्यक्षा देबजानी घोष यांनी व्यक्त केला.

'टेक वारी - महा तंत्रज्ञान प्रशिक्षण सप्ताह' अंतर्गत मंत्रालयात आयोजित कार्यक्रमात 'विकसित महाराष्ट्रासाठी फ्रंटियर तंत्रज्ञान' या विषयावर त्या बोलत होत्या. यावेळी महाराष्ट्र सदनच्या निवासी आयुक्त आर. विमला उपस्थित होत्या. मंत्रालयातील अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

देबजानी घोष म्हणाल्या, सध्या जग अन्नधान्याच्या तुटवड्याच्या संकटाला सामोरे जात आहे. महाराष्ट्राकडे तज्ज्ञ, कृषी उपकरणे, प्रशिक्षित कामगार आणि नव्या तंत्रज्ञानाचा उपयोग करण्याची क्षमता आहे. योग्य नियोजन आणि प्रभावी अंमलबजावणीद्वारे राज्य अन्नधान्याच्या जागतिक निर्यातीत आघाडीवर राहू शकते. नवीन तंत्रज्ञान, सुधारित बियाणं, ड्रोन, सिंचन प्रणाली यांचा वापर करून कृषी क्षेत्रात उत्पादनक्षमता वाढवता येईल. २०२० ते २०३० हे दशक कृत्रिम बुद्धिमत्तेचे (एआय) पर्व असणार आहे. कृषी, आरोग्य, ऊर्जा आणि उत्पादन क्षेत्रात 'एआय'च्या साहाय्याने मूलभूत बदल घडवता येऊ शकतात. बायोटेक म्हणजे जीवशास्त्र आणि 'एआय' यांचा संयोग आहे. बायोटेक म्हणजे जीवन नव्याने घडविणे होय. महाराष्ट्र राज्याच्या प्रगतीचा पाया म्हणजे 'आयआयटी' मुंबईसारखी शिक्षणसंस्था, स्टार्टअप इकोसिस्टम, उद्योगजगत, डिजिटल इकॉनॉमी, ग्रीन एनर्जी आणि प्रगत धोरणे यामुळे राज्य देशाच्या 'जीडीपी'मध्ये मोठा वाटा उचलू शकते. असेही त्यांनी सांगितले. आर. विमला यांनी सांगितले की, फक्त 'एआय'वर अवलंबून राहून चालणार नाही, तर विज्ञान आणि 'एआय' व इतर आघाडीच्या तंत्रज्ञानांच्या साहाय्याने उद्योग आणि कृषी क्षेत्रात ठोस योजना आखून काम करणे गरजेचे आहे. त्यासाठी अंमलबजावणी अत्यंत महत्त्वाची असल्याचेही त्यांनी सांगितले.

**'टेक वारी : महाराष्ट्र टेक लर्निंग वीक'चे उद्घाटन**

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रतिपादन**

# अधिक गतिमान, प्रशासनासाठी 'टेक वारी' उपक्रम मार्गदर्शक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : प्रशासन काळानुरूप बदल स्वीकारणारे असेल तर लोकांना अधिक गतिमान, पारदर्शक व चांगल्या सेवा मिळू शकतात. सामान्य प्रशासन विभागाने आयोजित केलेला 'टेक वारी': महाराष्ट्र टेक लर्निंग वीक' हा उपक्रम राज्यातील प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी प्रशासकीय क्षमता विस्तारण्यासाठी मार्गदर्शक ठरेल. आपण बदलांचा केवळ स्वीकार करत नसून बदलाचे नेतृत्व करत असल्याचा संदेश 'टेक वारी' उपक्रमाच्या माध्यमातून जाईल, असे मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केले.

मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगण येथे 'टेक वारी : महाराष्ट्र टेक लर्निंग वीक'चे उद्घाटन उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी माहिती व तंत्रज्ञान मंत्री ड. आशिष शेलार, प्रभारी मुख्य सचिव राजेश कुमार, महाराष्ट्र सदनच्या आयुक्त आर. विमला, प्रसिद्ध वक्ते प्रभु गौर गोपालदास यासह ज्येष्ठ सनदी अधिकारी, मंत्रालयातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, ५ ते ९ मे दरम्यान टेक वारी अंतर्गत हा प्रशिक्षण उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रशिक्षण कार्यक्रमातील प्रसिद्ध वक्ते प्रभु गौर गोपाल दास यांच्या मार्गदर्शनाचा फायदा सर्वांनाच होईल. ब्लॉकचेन, इंटरनेट ऑफ थिंग्ज्, सायबर सुरक्षा, डिजिटल फायनान्स 'तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रशासनाचे परिवर्तन' 'कृत्रिम बुद्धिमत्ता', विकसित महाराष्ट्रासाठी फ्रंटियर टेक' अशा क्षेत्रातील तज्ज्ञ विविध मार्गदर्शन सत्रांद्वारे हे विषय सोप्या पद्धतीने समजावून सांगणार आहेत. काळानुरूप बदल सगळ्यांनी स्वीकारून प्रशासन अधिक गतिमान करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री पवार यांनी व्यक्त केले.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, टेक-वारीमध्ये तणाव व्यवस्थापन, संगीत थेरपी, ध्यानधारणा, कार्य-जीवन समतोल या विषयांवरील मार्गदर्शन सत्रे आयोजित केली आहेत. यामुळे संतुलित व सुदृढ शासकीय कर्मचारी वर्ग घडविण्यास मदत होईल.

**'इज ऑफ लिव्हिंग'मध्ये महाराष्ट्र सर्वात पुढे राहील : प्रभारी मुख्य सचिव राजेश कुमार**

प्रभारी मुख्य सचिव राजेश कुमार म्हणाले की, नवीन तंत्रज्ञान अवगत करून अधिकारी व कर्मचारी काम करत आहेतच पण काळानुरूप आपल्या सेवा 'इज ऑफ लिव्हिंग' असल्या पाहिजेत. त्या अधिकाधिक लोकामिभुख असाव्यात यासाठी प्रशासनाने काम केले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

**'टेक-वारी' उपक्रमात मंत्रालय ते गावपातळीवरील अधिकाऱ्यांचा सहभाग - आयुक्त आर.विमला**

महाराष्ट्र सदनच्या आयुक्त आर. विमला म्हणाल्या की, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या प्रयत्नामुळे आणि राज्यातील अधिकारी व कर्मचारी यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे आज केंद्र शासनाच्या 'ऑय गॉट' प्रणालीवर सर्वाधिक प्रशिक्षण घेणारे महाराष्ट्र राज्य देशातील पहिल्या तीन मध्ये आहे. 'टेक-वारी' उपक्रम नाविन्यपूर्ण असून त्याचा लाभ नक्कीच सर्व अधिकारी घेतील, असे मत त्यांनी व्यक्त केले.

अपर मुख्य सचिव व्ही.राधा यांनी 'टेक वारी' या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन अथक परिश्रम घेवून केले, मात्र त्यांच्या वडिलांचे निधन झाले असल्याने त्या कार्यक्रमाला उपस्थित राहू शकल्या नाहीत. यावेळी अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या वडिलांच्या निधनाबद्दल त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

मंत्रालयात आरोग्य, शिक्षण, कृषी या विविध क्षेत्रातील स्टार्टअप्सचे, मन:शक्ती प्रयोगकेंद्रातील उपक्रमांच्या माहितीचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिल्पा नातू यांनी सूत्रसंचालन केले.

**महाराष्ट्र 'आय गॉट'वरही प्रथम येईल - माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार**




माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार म्हणाले की, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या माध्यमातून लोकाभिमुख काम करणारे महाराष्ट्र राज्य प्रत्येक क्षेत्रात पुढे आहे. 'आय गॉट' वर प्रशिक्षण पूर्ण करण्यात आपले राज्य पहिल्या तीनवरून प्रथम क्रमांक प्राप्त करेल. प्रशासनाने अधिक गतीमान सेवा देण्यावर भर द्यावा. आपल्या प्रत्येकाच्या कामाच्या मूल्यमापनातूनच एकंदरीत कामाचे मोजमाप होत असते महाराष्ट्र प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर आहे. प्रत्येक बदलाला सामोराही जात आहे. प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी देखील हे बदल स्वीकारून आपले काम अधिक गतीमान पद्धतीने करतील, असा विश्वास मंत्री ॲड. शेलार यांनी व्यक्त केला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात...

### मोबाईलच्या स्टेटसवरूण केली मारहाण ; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

सोलापूर : रविवार पेठ येथे तुझ्या भावाचे मोबाईलवर ठेवलेले स्टेटस काढून टाक नाहीतर तुझ्यामध्ये दम असेल तर सुतमील जवळ ये तुला उभ्याने चिर- तो असे म्हणून मारहाण केल्याची घटना




२८ एप्रिलला घडली. याप्रकरणी करण दीपक बनसोडे (वय २४, रा. जुना बोरामणी नाका) याने जेलरोड पोलिस ठाण्यात फिर्यादी दिली. त्याच्या फिर्यादीवरून आकाश मोहिते, विशाल मोहिते, विशाल मोहिते, गणेश मोहिते (सर्व रा. रविवार पेठ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या अधिक माहिती अशी की, यातील फिर्यादी करण बनसोडे यांचा भाऊ नागेश बनसोडे याचे मोबाईलवर स्टेटस ठेवले होते. तेव्हा संशयित आरोपी विशाल मोहिते याने फोन करून तुझ्या भावाचे स्टेटस काढून टाक नाहीतर तुझ्यामध्ये दम असेल तर सुतमील जवळ ये तुला उभ्याने चिरतो असे म्हणून शिवीगाळ करून मोबाईल बंद केला. यावेळी फिर्यादीचा भाऊ नागेश व मित्र सागर, आकाश असे रिक्षातून रविवार पेठ येथे गेले. तेव्हा तू फोनवर शिवीगाळ का करतो अशी विच- ारणा केल्यावर यातील संशयित आर- ोपींनी भाऊ नागेश यास लोखंडी रॉडने डाव्या हातावर मारून दुखापत केली. तसेच संशयित आरोपी गणेश मोहिते याने त्याची गच्ची पकडून मारहाण केली व सर्वांनी संगणमत करून मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

### दयानंद कॉलेज येथून दुचाकी पळविली

सोलापूर : दयानंद कॉलेज येथे हॅन्डल लॉक करून पार्क केलेली मोटरसायकल (क्रमांक एम एच १३ ए डब्ल्यू २६३०) ही चोरून येण्याची घटना २२ एप्रिलला घडली. याप्रकरणी अरविंद उपेंद्र चिलवेरी (वय-२० रा. नीलम नगर, एमआयडीसी) याने जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्याच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

### रेल्वे स्टेशन परिसरातून दुचाकी पळविली

सोलापूर : रेल्वे स्टेशन पंप हाऊस येथून येथे हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी (क्रमांक एम एच १३ डि के ५०६८) ही चोरून नेल्याची घटना सोम वारी (दि.५) घडली. याप्रकरणी अशपाक उस्मानगी शेख (वय-४२ रा.न्यू पाछा पेठ) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

### पतीने पत्नीस केली मारहाण

सोलापूर : किडवाई चौक येथे पतीने दारू पिऊन घरगुती वादातून पत्नीला मारहाण केल्याची घटना २९ एप्रिलला घडली. याप्रकरणी अलाशा मुस्तफा नदाफ (वय-२८,रा. बैतूल मुकरम अपार्टमेंट, किडवाई चौक) यांनी जेलरोड पो- लीस ठाण्यात फिर्यादी दिली.त्यांच्या फिर्यादीवरून पती मुस्तफा यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

# दैनिक यश सिद्धी न्यूजच्या पत्रकारांवरती हल्ला करणाऱ्यावर कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना निवेदन

## रुग्ण वाहिनी की तलवार वाहिनी, रुग्ण वाहिनीतुन चक्क तलवारीची वाहतूक



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/ प्रतिनिधी : इंदापूर येथील दैनिक यश सिद्धी न्यूज चे इंदापूर प्रतिनिधी अतुल सोनकांबळे यांच्या वरती काही अज्ञात इसम ने हल्ला केला आहे. त्या इसमा वरती कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य जनसेवा पत्रकार संघ इंदापूर तालुका यांच्या वतीने अजित दादा पवार यांना निवेदन देण्यात आले आहे.

सविस्तर हकीकत अशी की अतुल सोनकांबळे हे आपल्या म ोटरसायकल मध्ये पेट्रोल टाकण्यासाठी पेट्रोल पंपा वरती थांबले असता त्यांना

पुणे सोलापूर हावेवरील पुणे कडील दिशेने जाणाऱ्या तीन अंबुलन्स आढळून आल्या त्यापैकी एका म्बुलन्स मध्ये तलवारी असल्याचे सोनकांबळे यांच्या लक्षात आल्यामुळे त्यांनी पुढील होणारा अनर्थ टाळण्यासाठी सदरील म्बुलन्सची शूटिंग करून बातमी करण्याचा प्रयत्न केला असता अंबुलन्स चालकाने अतुल सोनकांबळे यांच्या वरती हल्ला केला.

अतुल सोनकांबळे यांनी इंदापूर पोलिसांना फोनवरून कळविले असता इंदापूर पोलिसांनी दखल घेऊन पुढील तपास इंदापूर पोलीस करीत आहेत.

### पोलिसांच्या तत्परतेमुळे वाचला पत्रकाराचा प्राण

**पुणे सोलापूर हायवे वरती गलांडवाडी नंबर १ माने पेट्रोल पंपा समोर थांबलेल्या म्बुलन्स मधे तलवारी पाहुन व्हिडिओ शूटिंग करण्यासाठी गेलेल्या पत्रकार अतुल सोनकांबळे यांच्या वरती ॲम्बुलन्स ड्रायव्हर यांनी हल्ला करून अल्लाथा बुक्क्या व दगडाने मारहाण केली परंतु सुदैवाने पोलीस घटनास्थळी दाखल झाले व होणारा अर्थ टळला.**

**रुग्णांच्या सेवेसाठी असलेली रुग्णवाहिनीतून जर तलवारी सारखे शस्त्र वाहतूक केले जात असतील तर रुग्णवाहिनींना तलवार वाहिनी म्हणावे का ?**

**एकाच पासिंगच्या तीन ऍम्ब्युलन्स गाड्या एकत्रित व एकाच ठिकाणी का थांबल्या ?**

**ॲम्बुलन्स ड्रायव्हर जर पिलेले असतील तर रुग्णालयात रुग्न पोहोचतील का ?**

**ॲम्बुलन्स मधून तलवारीची वाहतूक का व कशासाठी केली जात होती एवढ्या साऱ्या तलवारी कशासाठी व कुठे घेऊन जात होते याचा तपास होणे गरजेचे आहे**

**फरार झालेली तिसरी म्बुलन्स पोलीस तपासून काढतील का?**

**एवढ्या साऱ्या तलवारी घेऊन कुठे दंगल घडवायची होती का?**

**असे अनेक प्रश्न उपस्थित होत असून संबंधित आरोपींवरती कठोरातील कठोर कारवाई करून सखोल चौकशी व्हावी असे नागरिक बोलत आहेत.**

## इंदापूरच्या आश्रमशाळेत निकालात मुलींची बाजी १२ वी. विज्ञान व कला शाखेचा ९६ टक्के निकाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : येथील राजमाता अहिल्याबाई होळकर निव- ासी कनिष्ठ महाविद्यालयाच्या विज्ञान व कला शाखेच्या मुला- मुलींचा बारावीचा निकाल ९६ % टक्के लागला असून दोन्ही शाखेंनी कॉलेजच्या यशाची परंपरा कायम राखत यंदाही घवघवीत यश संपादन केले आहे.

विज्ञान शाखेचे पहिले तीन मानकरी

- शेकडा गुणांसह -

१) कु.गायकवाड पायल चंद्रकांत -६७.३३%. २) कु.चव्हाण क्रांती कैलास -६३.५० % ३) कु. काळेल स्नेहल निवास -६२.६७%

कला शाखेचे पहिले तीन मानकरी शेकडा गुणांसह -

१) कु. गुटाळ प्रियंका कानिफनाथ ६३% २) घोडके रोहित शहाजी ५६.६७ % ३) कु. कोथमिरे आरती गणेश -५२.१७%

वरील मानकऱ्यांसह उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या मार्गदर्शक शिक्षकांचे व प्राचार्या अनिता साळवे यांचे मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्टच्या अध्यक्षा शकुंतला रत्नाकर मखरे, उपाध्यक्ष तानाजी मिसाळ, कार्याध्यक्ष ॲड. रा- हुल मखरे, सचिव ॲड. समीर मखरे यांनी अभिनंदन केले.

यशस्वी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



## कल्याणशेट्टी महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराज पुण्यतिथी कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराज पुण्यतिथी निमित्त इतिहास अभ्यास मंडळाच्या वतीने प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, डॉ बाळासाहेब पाटील, प्रा मनीषा शिंदे, प्रा मधुबाला लोणारी, प्रा कल्पना स्वामी, प्रा स्वप्नाली जमदाडे,प्रा रवींद्र कालीबत्ती, बसवराज कामाठी आदी उपस्थित होते.

### राजर्षी शाहू महाराज रयतेचा राजा मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस अभिवादन केल्यानंतर संस्थेचे ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी म्हणाले की, राजर्षी शाहू महाराज यांनी वंचित उपेक्षित अस्पृश्य समाजाला न्याय दिला, शेतकरी शेतमजूर यांचे प्रश्न सोडविले, मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा केला. शिक्षण, साहित्य, क्रीडा व संस्कृती या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली म्हणूनच ते रयतेचा राजा म्हणून ओळखले जातात. असे गौरव उद्गार त्यांनी काढले.**

राजर्षी शाहू महाराज यांनी शैक्षणिक, सामाजिक अस्पृश्य उद्धाराचे कार्य केले. समता बंधुत्वाचे शिकवण त्यांनी दिली. म्हणून पुरोगामी महाराष्ट्र त्यांचा ऋणी राहील अशी भावना मान्यवरांनी व्यक्त केली. प्रस्ताविक डॉ बाळासाहेब पाटील यांनी केले आभार प्रा. मनीषा शिंदे यांनी मानले.

## ३२ वर्षांनी भेटल्या शाळेच्या मैत्रिणी श्री क्षेत्र नरसोबावाडी येथे गळाभेट



टाकळीवाडी/प्रतिनिधी

कुरुंदवाड तालुका शिरोळ येथील कन्या विद्यामंदिर नंबर २ या शाळेमध्ये शिकत असलेल्या इयत्ता ४ थी या वर्गातील १९९४ या वर्षातील विद्यार्थिनी श्री क्षेत्र नरसोबावाडी येथे भेटून एकमेकांच्या गळाभेटी घेतल्या व आपला आनंद साजरा केला.

एकूण ३२ वर्षांनी एकत्र आल्याने अनेकांच्या आनंदाला पारा राहिला नव्हता. मैत्रिणी वेगवेगळ्या चांगल्या पोस्टवर कार्यरत आहेत. कोणी शिक्षक, महसूल विभाग, शहराध्यक्ष, विमा कंपनी तसेच सरपंच, अशा वेगवेगळ्या पदावर आपली सेवा बजावत आ- हेत. याच वर्गातील एक मैत्रीण पुण्याहून स्वतः ड्रायव्हिंग करत श्री क्षेत्र नरसोबावाडी येथे पो- होचली होती. तिने सर्व मैत्रिणींना विशेष अशी भेट वस्तू सुद्धा आणली होती. खरंच प्राथमिक शाळा ही प्राथमिक शाळाच असते असं म्हणावं लागेल. शाळेतील बालपण पुन्हा पुन्हा यावे अशी आशा अनेक मैत्रिणी व्यक्त केली.

## डाक विभागाची ज्ञान पोस्ट ही नवीन सेवा सुरु, लाभ घेण्याचे आवाहन

पंढरपूर : भारतीय डाक विभागाने देशाभरातील सर्व पोस्ट ऑफिसमध्ये दि.०१ मे पासून ज्ञान पोस्ट या नवीन सेवेची सुरुवात करण्यात आली आहे. या सेवेंतर्गत ज्ञान प्रसाराचे लेखी दस्तावेज, पुस्तके, सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक साहित्य (लेखन) माफक दरात डाक सेवेच्या माध्यमातून पाठवणे शक्य होणार आहे. ही सेवा पंढरपूर प्रधान डाक घर येथे उपलब्ध असल्याची माहिती डाकघर अधिक्षक चंद्रकांत भोर यांनी दिली.

या सेवेअंतर्गत टपाल विभाग सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक म हत्त्वाच्या शिक्षणाला प्रोत्साहन देईल. शैक्षणिक पुस्तके, स्पर्धा परीक्षांच्या तयारीशी संबंधित अभ्यास, साहित्य आणि सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्राशी संबंधित पुस्तके महत्वाची पाठवण्यासाठी एक विशेष सेवा प्रदान करेल. सेवेद्वारे वस्तूचे ट्रॅक व ट्रेस सुविधा उपलब्ध असणार आहे तसेच रजिस्ट्रेशन, इंस्शुरन्स, वितरणाचा पुरावा, अशा 'मूल्यवर्धित सेवांचा' ही समावेश असणार आहे. त्याचबरोबर पुस्तके असलेल्या पॅकेटवर ज्ञान पोस्टअसे चिन्हांकित केले जावे. पॅकेटम ध्ये ठेवलेल्या प्रत्येक पुस्तकावर मुद्रक किंवा प्रकाशकाचे नाव असावे.पुस्तकांमध्ये 'आकस्मि क घोषणा' किंवा 'पुस्तकांची यादी' व्यतिरिक्त कोणतीही जाहिरात असू नये.या उत्प- ादनाद्वारे व्यावसायिक किंवा व्यावसायिक स्वरूपाचे कोणतेही पुस्तक पाठवले जाणार नाही.

ज्ञान पोस्ट अंतर्गत कमीत- कमी ३०० ग्रॅम वजनाचे पॅकेट २० रुपयांपासून सुरु होतात आणि ५ किलो ग्रॅमच्या वजनाच्या पॅकेटसाठी लागू कर वगळून १०० रुपयांपासून सुरु होतात. ज्ञान पोस्ट ही सेवा ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थाना उपयुक्त ठरणार असून, ज्ञान पोस्ट या सुविधेचा लाभ सर्वांनी घ्यावा असे आवाहन पंढरपूर डाकघर अधिक्षक चंद्रकांत भोर यांनी केले आहे.

### जागतिक मातृत्व दिनानिमित्त गुणवंत मातांच्या सत्कार समारंभ

# सुसंस्कार करणाऱ्या माता देश घडवित असतात : डॉ. श्रीकांत येळेगावकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : आई हे प्रेमाचे, वात्सल्याचे, त्यागाचे, कष्टाचे, प्रतीक असते. ती केवळ मुलांचे संगोपन करत नसते तर त्यांच्यावर सुसंस्कार करण्याचे त्यांचे व्यक्तिमत्व घडविण्याचे काम करते. सुसंस्कार करणाऱ्या माता या देश निर्माण करण्याचा, देश घडविण्याचे काम करतात असे प्रतिपादन फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे मार्गदर्शक डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले.

ते रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर ईलाईट, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा व इंडियन रेड क्रॉस सोसायटी, शाखा सोला- पूर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक मातृत्व दिनानिमित्त गुणवंत मातांच्या सत्कार समारंभ प्रसंगी बोलत होते.




यावेळी इंडियन मेडिकल असोसिएशनच्या नवनिर्वाचित अध्यक्षा डॉ. मंजुषा शहा, रोटरी ई क्लबचे अध्यक्ष सचिन तोष्णीवाल, सचिव आदर्श गोयदानी, सोलापूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण डी.एम. कन्सल्टंट अर्चना बिसोई सोलापूर जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण केंद्राचे प्रभारी जिल्हा कार्यक्रम अधिकारी तथा सुपरवायझर कृष्णा सकट, क्लस्टर प्रोग्राम ऑफिसर ब्रम्हदेव श्रीमंगले, सांख्यिकी अधिकारी दिनेश राठोड, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, समुपदेशक कपिल भालेराव आदी उपस्थित होते.

नंदा कुमार वाघमारे या म हानगरपालिकेत झाडूवाली म्हणून बदली कामगार या पदावर काम करत आपल्या मुलाला न्यायाधीश बनवले व दोन मुलींना नर्सिंगचे शिक्षण दिले. सुजाता दुर्गादास वंगा यांनी बांगडीचा व्यवसाय आणि घरगुती मेस चाल- वून दोन मुलांना इंजिनीरिंगचे तर एका मुलीला 'डी' फार्मासिचे शिक्षण दिले आता ते सर्वजण चांगल्या ठिकाणी नोकरी करत आहेत. सुनीता अनिल नळे यांनी मुलगा मुलगी असा भेद न करता दोन मुलींवर कुटुंब नियोजनाचे ऑपरेशन केले. त्या बांगडी भरण्याचा व्यवसाय करत एका मुलीला एम. टेक पर्यंतचे शिक्षण दिले तर दुसऱ्या मुलीला बी.कॉम. पर्यंत चे शिक्षण दिले. त्या दोघी पुणे येथे नौकरी करत आहेत. प्रातिनिधिक स्वरूपात या तीन गुणवंत मातांचा सत्कार बुके, श्रीफळ, शाल, साडी व भेटवस्तू देऊन डॉ. मंजुषा शाहा यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे स्वागत, प्रास्ताविक व गुणवंत मातांचा परिचय सुगतरत्न गायकवाड यांनी करून दिला. सूत्रसंचालन वीरेंद्र परदेशी यांनी केले तर आभार सचिन तोष्णीवाल यांनी मानले.

## मुलीला बोलत असल्याच्या रागातून मारहाण

सोलापूर : प्रताप नगर तांडा येथे मुलीसोबत बोलत असल्याच्या कारणावरून लोखंडी वस्तूने मारहाण केल्याची घटना पाच एप्रिलला घडली. याप्रकरणी ऋतिक नागनाथ राठोड (वय २०, रा. प्रताप नगर तांडा, विजापूर रोड) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्याच्या फिर्यादवरून मिथुन धनसिंग पवार, अंजली पवार, गंगा पूर्ण नाव माहित नाही (सर्व रा. प्रताप नगर तांडा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यात अधिक माहिती अशी की, यातील संशयित आर- ोपी मिथुन पवार याने फिर्यादी ऋतिक राठोड याच्या भावाच्या मुलीसोबत बोलत असल्याच्या वादातून लोखंडी वस्तूने फिर्यादीला मारहाण केली. तसेच फिर्यादीची आजी शांताबाई राठोड ही भांडण सोडवण्यासाठी आल्यावर तिच्या डाव्या हाताच्या करंगळीवर मारून जखमी केले. तसेच संशयित आरोपी अंजली पवार व गंगा यांनीही फिर्यादीस शिवीगाळ करून मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

# पाकणी येथील वनविभागाच्या जागेतील प्रस्तावित जलशुद्धीकरण केंद्राचा मार्ग अखेर मोकळा

## आमदार देवेंद्र कोठे यांच्या प्रयत्नांना यश : पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी मिळवून दिली मान्यता :

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे सोलापूर महानगरपालिकेचे वाचणार ८ कोटी रुपये



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापूरकरांच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या पाणी प्रश्नातील महत्त्वाचा घटक असलेल्या पाकणी येथील प्रस्तावित जलशुद्धीकरण केंद्राचा मार्ग मंगळवारी झालेल्या शासन निर्णयामुळे अखेर मोकळा झाला आहे. आमदार देवेंद्र कोठे यांनी याबाबत शासन दरबारी केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून या शासन निर्णयामुळे सोलापूर महानगरपालिकेचे आठ कोटी रुपये वाचणार आहेत. या निर्णयाकरिता आमदार देवेंद्र कोठे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे आभार मानले आहेत.

सोलापूर शहरवासियांना पाणीपुरवठा करणाऱ्या उजनीतून जलवाहिनीद्वारे आलेले पाणी शुद्ध करण्यासाठी पाकणी येथे ६६ एमएलडी जलशुद्धीकरण केंद्र प्रस्तावित आहे. या जलशुद्धीकरण केंद्रासाठी वनविभागाची जागा सोलापूर महानगरपालिकेला हस्तांतर करण्याचा विषय गेल्या अनेक महिन्यांपासून प्रलंबित होता. या प्रश्नी आमदार देवेंद्र कोठे यांनी पुढाकार घेऊन ३० जानेवारी रोजी झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आवाज उठवला. सोलापूर महानगरपालिकेने जलशुद्धीकरण केंद्रासाठी जागा हस्तांतरित न करून घेताच निविदा काढल्याने महापालिकेचा भोंगळ कारभार आमदार देवेंद्र कोठे यांनी चव्हाट्यावर आणला. तसेच पाकणी येथील वनविभागाची जागा सोलापूर महानगरपालिकेला हस्तांतरित करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी आणि नियमित पाठपुरावा केला होता. यावर सोलापूरची पाणी समस्या सोडवण्यासाठी लवकरच सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आमदार देवेंद्र कोठे यांना दिले होते. अखेर मंगळवारी शासनाने वनविभागाची जागा जलशुद्धीकरण केंद्रासाठी सोलापूर महानगरपालिकेला हस्तांतरित करण्याबाबतचा शासन निर्णय जाहीर करून सोलापूरकरांना मोठा दिलासा दिला आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांना सोलापूर जिल्ह्यातील नव्याने प्रस्तावित नगर - सोलापूर - अक्कलकोट - महाराष्ट्र कर्नाटक सीमा हद्द ग्रीनफिल्ड अलाइनमेंट राष्ट्रीय महामार्गात बाधित होत असलेल्या ५ हेक्टर २३ आर व सोलापूर शहराच्या पाणीपुरवठा सुधारण्याकरिता उजनी ते सोलापूर समांतर जलवाहिनी टाकण्यासाठी पाकणी जलशुद्धीकरण केंद्र येथील अस्तित्वात असलेले ८० एमएलडी जलशुद्धीकरण केंद्र आणि प्रस्तावित असलेले ६६ एमएलडी जलशुद्धीकरण केंद्रासाठी बाधित होत असलेल्या ६ हेक्टर वन जमिनीच्या मोबदल्यात आंधळगाव (ता. मंगळवेढा) येथील एकूण ११ हेक्टर २३ आर गायरान जमीन ग्रीनफील्ड अलाइनमेंट राष्ट्रीय महामार्गात बाधित होत असलेल्या ५ हेक्टर २३ आर वनीकरण संदर्भात भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्याकडून एनपीव्हि वसूल करून व चालू वर्षाच्या बाजारभावानुसार येणारे मूल्यांकन भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्याकडून वसूल करून शासनाची पूर्व मान्यता देण्यात आली आहे. तसेच जलशुद्धीकरण केंद्रकरिता बाधित होत असलेल्या ६ हेक्टर वनीकरणाबाबत सोलापूर महानगरपालिकेकडून एनपीव्ही वसूल करून आणि पाणीपुरवठा हे सार्वजनिक प्रयोजन असल्यामुळे महसूलमुक्त व भोगवटामूल्यरहित किमतीने वनसंरक्षक (वनविभाग सोलापूर) यांना कब्जे हक्काने प्रदान करण्यास शासनाने मंगळवारी मंजुरी दिली. शासनाच्या या निर्णयामुळे सोलापूरकरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार आहे.

### महापालिकेचे वाचणार ८ कोटी रुपये

**सोलापूर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहता वनविभागाच्या जागेचा मोबदला म्हणून ८ कोटी रुपये देणे महापालिकेला शक्य नाही. यावर उपाय म्हणून ही जागा महापालिकेकडून एनपीव्ही वसूल करून महसूलमुक्त व भोगवटामूल्यरहित किमतीने कब्जे हक्काने देण्याकरिता पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी शासनाकडे वारंवार पाठपुरावा केला. यानंतर सोलापूर महानगरपालिकेचे ८ कोटी रुपये वाचण्याकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा घेतला.**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सोलापूरकरांना दिलेला विकासाचा शब्द या शासन निर्णयाच्या माध्यमातून पुन्हा एकदा पाळला आहे. गेल्या अनेक दशकांपासून प्रलंबित असलेल्या सोलापूरच्या पाणीपुरवठ्याची समस्या पूर्णत्वाने सोडवण्याकरता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या निर्णयाबद्दल समस्त सोलापूरकरांतर्फे मुख्यमंत्र्यांचे आभार मानतो.**

## थोडक्यात...

### अज्ञात चोरट्याने ५३ हजार रुपये चोरले, गुन्हा दाखल

सोलापूर : रामलाल चौक रेल्वे लाईन येथे श्रीराम हार्ट अँड आय केअर सेंटर येथे अज्ञात चोरट्याने रोख रक्कम ५३ हजार रुपये चोरून नेल्याची घटना गुरुवारी (दि. १) घडली. याप्रकरणी प्रगती तानाजी कोकाटे (वय-२४, रा. मु. पो. बेलाटी, ता. उत्तर सोलापूर) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यात अधिक माहिती अशी की, यातील फिर्यादी प्रगती कोकाटे या ड्युटी संपल्यावर घरी जाताना भैया चौक येथे नाश्ता करण्यासाठी गेल्या. यावेळी तेथे पैसे देताना त्यांच्या लक्षात आले की बॅगेत पाच हजार रुपये पैकी तीन हजार रुपये रोख रक्कम कमी आहे. त्यानंतर घरी गेल्यानंतर हॉस्पिटलचे एच आर समीर भालेराव यांना कळविले. त्यानंतर फिर्यादी स्वतः हॉस्पिटलमध्ये येऊन हॉस्पिटलचे ऐओ यांना भेटून घडलेल्या घटनेबाबत सांगितले. त्यानंतर फिर्यादी यांनी सर्वांकडे चौकशी केली. यापूर्वी २९ एप्रिलला ही त्यांचे ५० हजार रुपये चोरीस गेले होते. तेव्हा त्यांनी सर्वांना विचारपूस केली होती. तरीही कोणीही प्रतिसाद दिला नाही.
त्यामुळे एकूण रोख रक्कम ५३ हजार चोरट्याने चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद आहे.



## महापुरुषांनी विकासाचा मार्ग आखला : श्री सुनील वारे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : कोल्हापूर संस्थानांचे राजे राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या राज्यातील उपेक्षित वंचित बहुजन समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. अस्पृश्यतेचे उच्चाटन, सक्तीचे शिक्षण, शेती, उद्योग, कला, क्रीडा, आरोग्य क्षेत्राला शाहू महाराजांनी चालना दिली. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन मूकनायकला आर्थिक मदत केली महाराजांनी रयतेच्या कल्याणासाठी काम केल्यामुळेच त्यांना लोककल्याणकारी राजा म्हणून संबोधले जाते. महापुरुषांचे विचार आपण आचरणात आणावेत असे मत बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनील वारे यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन प्रसंगी बोलताना व्यक्त केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे येथे दिनांक ६ मे २०२५ रोजी लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस मा महासंचालक श्री वारे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार, विभागप्रमुख श्रीमती स्नेहल भोसले, वृषाली शिंदे, उमेश सोनवणे, दादासाहेब गिते, शुभांगी पाटिल यांनीही अभिवादन केले.

विभागप्रमुख श्री उमेश सोनवणे यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या कार्याला उजाळा दिला. यावेळी बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचलन श्री रामदास लोखंडे यांनी केले. आभार डॉ अंकुश गायकवाड यांनी मानले.

## स्वेरीमध्ये 'महाराष्ट्र दिन' व 'कामगार दिन' साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर- गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरी तथा श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूटमध्ये आज दिनांक ०१ मे २०२५ रोजी 'महाराष्ट्र दिन' व 'कामगार दिन' साजरा करण्यात आला.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. त्यामुळे या दिवशी 'महाराष्ट्र दिन' हा सार्वजनिक कार्यक्रमांबरोबर साजरा केला जातो तसेच कामगार आणि श्रमिक वर्ग हे देशाचे आधारस्तंभ आहेत त्यामुळे त्यांच्या योगदानाला उजाळा देण्यासाठी 'आंतरराष्ट्रीय कामगार दिन' हा दरवर्षी ०१ मे रोजी साजरा केला जातो. कामगारांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्या योगदानाला आदराने गौरवण्यासाठी हा दिवस अत्यंत महत्त्वाचा आहे. स्वेरीमध्ये स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर (ऑटोनॉमस)चे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली 'महाराष्ट्र दिन' व 'कामगार दिन' साजरा करण्यात आला. कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ.एम. जी. मणियार यांनी भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करून ध्वजारोहण केले. राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीतानंतर प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी 'महाराष्ट्र दिन' व 'कामगार दिन' का साजरा करायचा हे सांगून दोन्ही दिनांचे महत्व पटवून दिले. यावेळी स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. एम.पी. ठाकरे, प्रशासन अधिष्ठाता डॉ. आर.आर. गिड्डे, मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ. एस. बी.भोसले, कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. एस. पी. पवार, इंटर्नल क्वालिटी अशुरन्स सेलचे समन्वयक डॉ. एस. एस. वांगीकर, एम.बी.ए. चे विभागप्रमुख डॉ.कमल गलानी, सर्व अधिष्ठाता, स्वेरी अंतर्गत असलेल्या चारही महाविद्यालयांतील प्राध्यापक वर्ग आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलची १०७ वी शतकोत्तर वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न**

# जस्टीस ऑफ पीस, सत्यशोधक, रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे यांचे कामगार चळवळीतील योगदान समजून घेणे आवश्यक आहे : बी. बी. मेश्राम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जनसंपर्क कार्यालय, साकेत नगर, छत्रपती संभाजी नगर येथे महाराष्ट्र दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिनानिमित्त भारतीय कामगार चळवळीचे जनक : जस्टीस ऑफ पीस सत्यशोधक रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे यांचे कामगार चळवळीतील योगदान. या विषयावर १०७ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा १ मे २०२५ ला संपन्न झाली.



फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, व्यावहारीक जीवनात ज्ञान आणि कौशल्याचा सदुपयोग करणारा व्यक्ती यशस्वी होतात. करिता मानवी जीवनातील परस्पर संबंधांचे व्यवस्थापनात संदेश देण्यासाठी संपर्क करताना संवादाचे रुपांतर सुसंवादात होऊ शकले तर सर्व कामगार संपन्न होऊ शकतील. नारायण मेघाजी लोखंडे यांनी रेल्वेत कारकून, पोस्टात पोस्ट मास्तर तर कंपनीत भांडारपाल म्हणून काम करताना कामगारांच्या व्यथा, वेदना दूर करण्यासाठी त्यांना संघटीत करण्याचे महान कार्य केले. त्यांनी महिलांच्या उत्थानासाठी पंचदर्पन मासिक चालविले होते. त्यांनी महत्प्रयासाने रविवारची सुट्टी मिळवून दिली आहे. त्याचा कामगारांनी सदुपयोग करून कामगारांना संघटित केले पाहिजे जेणेकरून येणाऱ्या काळात त्यांना आपले अस्तित्व टिकवून ठेवता येईल.

म्हणून आपण सर्वांनी राजाराम सुर्यवंशी लिखित सत्यशोधक कामगार नेते नारायण मेघाजी लोखंडे यांचे चरित्र समजून घेणे आवश्यक आहे. जेणेकरून त्यांचे कामगार चळवळीतील योगदान लक्षात येईल. परिणामी जस्टीस ऑफ पीस, सत्यशोधक, रावबहादूर, फॅक्टरी कायदा, पंचदर्पन, दीनबंधू, रविवारची सुट्टी, ट्रेड युनियन, १८९३ ची हिंदू-मुस्लिम दंगल : शोध आणि बोध, संपाचे हक्क, मलिक अंबर ते शिवाजी इत्यादी विषयांवरील नारायण मेघाजी लोखंडे यांच्या योगदानाबद्दल आपणास जाणीव होऊ शकेल. करिता प्रासंगिकता लक्षात घेऊन महाराष्ट्र दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिनानिमित्त या विषयावर ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना मसिआचे अध्यक्ष अर्जुन गायकवाड म्हणाले की, उद्योगधंद्यात कार्यरत असणारा आजचा कामगार उद्या मालक कसा होईल? असा विचार केला पाहिजे. मानवीय दृष्टीकोनातून कामगाराकडे बघितले पाहिजे. नारायण मेघाजी लोखंडे यांनी आठवड्यातून एक दिवस सुट्टीची मागणी केली होती. कामाचे तास ठरवून दिले पाहिजे. औद्योगिक क्षेत्रात महिला सुरक्षेकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे. कमी वेळात चांगले कार्य करण्यासाठी आवश्यक कौशल्य विकसित केले पाहिजे जेणेकरून सामाजिक विकास होऊ शकेल.

प्रमुख वक्ते म्हणून बोलताना प्रतिष्ठान महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. उमाकांत राठोड म्हणाले की, १८८६ मध्ये दहा लाख कामगारांनी एकत्रित येऊन कामाचे तास निश्चित करण्याची मागणी केली होती. तत्कालीन परिस्थितीत उद्भवलेल्या दंगलीत शांतता प्रस्थापित करण्याचे महान कार्य केल्याने त्यांना राव बहादूर ही पदवी बहाल करण्यात आली होती. जातीय व्यवस्थेने वरच्याला माथा आणि खालच्यांना लाथा ही परिस्थिती निर्माण केल्याने जात आजतागायत टिकून आहे. ते आधार नष्ट केल्याशिवाय जात नष्ट होणार नाही. जात नष्ट झाली पाहिजे परंतु माझी सोडून, ही भूमिका बदलली पाहिजे. अमरावती जिल्ह्यातील दत्त दस्तगीर या गावातून शतप्रतिशत जात नष्ट करण्यात आली परंतु त्यांना गावाचा विकास करता आला नाही. केवळ टीसीवरून जात काढून जात नष्ट होणार नाही. हे एकट्या दुकट्याचे काम नाही यासाठी प्रशिक्षित कार्यकर्त्यां मार्फत सांघिक प्रयत्न केले पाहिजेत. अस्मिता म्हणजे नेणिवेत असलेली जाणीव होय. घटना पायदळी तुडविणारे घटनेच्या माध्यमातून सत्तेवर आलेले आहेत.

याप्रसंगी उद्योजक मिलिंद बागूल म्हणाले की, बुद्धिष्ट इंडस्ट्रीयल ट्रेडर्स एंड मॅन्युफॅक्चरर्स असोशिएशन म्हणजे बिमाटा चांगल्या कामासाठी कार्यरत आहे. औद्योगिक क्षेत्रात १९७७ पासून मसिआ कार्यरत आहे, ज्याचे अर्जुन गायकवाड हे ४९ वे अध्यक्ष आहेत. प्रा. प्रगती कोरडे म्हणाल्या की, उणिवा, जाणिवासह दु:ख भोगल्याशिवीय खरी परिस्थिती कळत नसते. सर्व समस्यांवर चिंता करण्यापेक्षा चिंतन केले पाहिजे. सतिश कोरडे म्हणाले की, देश स्वतंत्र झाल्यापासून आजपर्यंत आपण मूलभूत अधिकार मिळवू शकलो नाही. कामगारांनी आपले प्रकृती स्वास्थ्य जपले पाहिजे. इंजिनिअर किशोर पाटील म्हणाले की, आपण बहुजन ९७ टक्के असून सुद्धा गुलामगिरीतून मुक्त होऊ शकलो नाही. अशोक मेश्राम म्हणाले की, समाजात संघटीत व असंघटीत असे दोन प्रकारचे कामगार आहेत. सोहेल पटेल म्हणाले की, सर्व क्षेत्रात खाजगीकरण होत असताना कामगार संघटना निष्क्रिय पहायला मिळत आहेत.

प्रास्ताविक व सुत्रसंचालन एड. विलास रामटेके यांनी केले. सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या तर स्टडी सर्कलच्या वतीने उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. या कार्यशाळेला एड. विलास रामटेके, इंजिनिअर किशोर पाटील, उद्योजक अर्जुन गायकवाड, बी. बी. मेश्राम, अशोक मेश्राम, प्राचार्य विलास कटारे, सुभाष ठोकळ, उद्योजक मिलिंद बागूल, प्रा. प्रगती कोरडे, सतिश कोरडे, सुभाष कोसरे, सोहेल पटेल, एड. डी. बी. मेश्राम, साधू आनंद इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने कार्यशाळा हर्षोल्हासात संपन्न झाली.